दैनिक

# वादळ वार्ता

महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

vadalvartanews@gmail.com

संपादक : अजय भांगे

https://epaper.vadalvarta.com

● बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी ● बुधवार दि.७ जानेवारी २०२६ ● 9422660077 ● आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष ३ रे ● अंक १३४ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

● Beed (Mahmar) Daily Marathi ● Wednesday 7 January 2026 ● 9422660077 ● RNI-MAHMAR / 2023 / 87555 ● Year - 3rd ● Issue 134 ● Pages 4 ● Rate 4 Rs


### बिनविरोध निवडी हा चांगला पायंडा

**मुंबई**–भाजपचे नेते चंद्रशेखर बावनकुळे यांनी देखील बिनविरोध निवडींचे समर्थन करत, विरोधकांचे आरोप फेटाळून लावले होते. निवडणूक बिनविरोध व्हायला काय हरकत आहे? हा एक चांगला पायंडा आहे. यापूर्वी राज्यात बिनविरोध सरपंच निवडून यायचे, तेव्हा आम्ही कधीच विरोध केला नाही. जनतेला विकास हवा आहे, म्हणून त्यांनी सत्ताधाऱ्यांच्या मागे उभे राहण्याचे ठरवले आहे. बिनविरोध निवडीमध्ये कोणत्याही नियमाचे उल्लंघन झालेले नाही. मग यात आक्षेप घेण्यासारखे काय? असा सवाल बावनकुळे यांनी विरोधकांना विचारला होता.

# बिनविरोध निवडी हा चांगला पायंडा

## यामध्ये नियमांचे उल्लंघन होण्यासारखे काय आहे? चंद्रशेखर बावनकुळेंचा विरोधकांना सवाल



**बिनविरोध निवडीवरून राजकारण तापलेले असतानाच, निवडणूक बिनविरोध व्हायला काय हरकत आहे? हा एक चांगला पायंडा आहे. यामध्ये नियमाचे उल्लंघन होण्यासारखे काय आहे? असा प्रतिसवाल भाजप नेते चंद्रशेखर बावनकुळे यांनी केलाय. ते आज छत्रपती संभाजीनगर येथे पत्रकारांशी संवाद होते. यावेळी त्यांनी राज ठाकरे यांच्यावरही बोचरी टीका केली. राज ठाकरे यांच्या सभांना आता पूर्वीसारखी गर्दी होत नसेल, म्हणूनच ते आता मुंबईतील शिवसेना–मनसेच्या शाखांना भेटी देत फिरत आहेत, असे ते म्हणाले.महानगरपालिका निवडणुकीत अनेक उमेदवार बिनविरोध निवडून आल्यानंतर विरोधकांकडून सत्ताधाऱ्यांवर आरोप सुरू आहेत. या बिनविरोध निवडीविरोधात मनसे नेते अविनाश जाधव यांनी आज राज्य निवडणूक आयुक्तांची देखील भेट घेत, त्यांच्यासमोर पुरावे सादर केलेत. यावर चंद्रशेखर बावनकुळे यांनी विरोधकांचे आरोप फेटाळून लावत, बिनविरोध निवडींचे समर्थन केले.**

**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी**

मुंबई आणि ठाण्यातील अनेक जागांवर महायुतीचे उमेदवार बिनविरोध निवडून आल्याच्या विरोधात मनसेने न्यायालयात धाव घेतली आहे. यावर बावनकुळे म्हणाले की, निवडणूक बिनविरोध व्हायला काय हरकत आहे? हा एक चांगला पायंडा आहे. यापूर्वी राज्यात बिनविरोध सरपंच निवडून यायचे, तेव्हा आम्ही कधीच विरोध केला नाही. जनतेला विकास हवा आहे, म्हणून त्यांनी सत्ताधाऱ्यांच्या मागे उभे राहण्याचे ठरवले आहे. राज ठाकरेंनी या प्रकरणी न्यायालयात जाण्याची गरज नव्हती, असेही त्यांनी नमूद केले.राज ठाकरे यांनी रविवारी शिवसेना भवनातून भाजपवर 'दुटप्पी' भूमिकेचा आरोप केला होता. पश्चिम बंगालमध्ये बिनविरोध निवडणुकांना विरोध करणारा भाजप महाराष्ट्रात त्याचे समर्थन कसे करतो, असा सवाल त्यांनी विचारला होता. याला उत्तर देताना बावनकुळे म्हणाले की, ज्याला जिथे जायचे आहे तिथे जाण्याचा अधिकार लोकशाहीत आहे. बिनविरोध निवडीमध्ये कोणत्याही नियमाचे उल्लंघन झालेले नाही. मग यात आक्षेप घेण्यासारखे काय?. सोलापूरच्या नेत्या प्रणिती शिंदे भाजपमध्ये प्रवेश करणार असल्याच्या चर्चांवर बावनकुळे यांनी स्पष्टीकरण दिले. प्रणिती शिंदे कधीही भाजप नेत्यांच्या भेटीला आलेल्या नाहीत आणि त्या आमच्या संपर्कातही नाहीत. अफवा पसरवून उगाच एखाद्याचे राजकीय करिअर कशाला उद्ध्वस्त करता? असे म्हणत त्यांनी या चर्चा फेटाळून लावल्या.

# धानोरा रोडच्या ५० फूट रुंदीकरणासाठी बीड शहर बचाव मंचाची जिल्हाधिकाऱ्यांची भेट

## कामामध्ये तांत्रिक बदल करून वाढीव निधी द्या–नितीन जायभाये

दैनिक वादळ वार्ता

**बीड । प्रतिनिधी**

धानोरा रोडच्या कामात तात्काळ तांत्रिक बदल करून ५० फूट रुंदीकरणासह भक्कम–दर्जेदार सिमेंट काँक्रीट रोडचे निर्माण करण्यात यावे तसेच यासाठी लागणारा वाढीव निधी तात्काळ मंजूर करण्यात यावा, या सर्व मागण्यासाठी बीड शहर बचाव मंचाचे वतीने जिल्हाधिकारी जॉन्सनची भेट घेण्यात आली. यावेळी बचाव मंचाचे अध्यक्ष नितीन जायभाये यांनी रोडच्या बाबतीत तांत्रिक बदल करण्यासाठी तसेच वाढीव निधीची तरतूद करण्यासाठी यासंदर्भातील सर्व अधिकार जिल्हाधिकारी तुम्हालाच आहेत असे स्पष्टीकरण मांडले. यावेळी जिल्हाधिकारी यांनी यासंदर्भातील सर्व बाबी तपासून या संबंधातील सर्व अधिकाऱ्यांशी चर्चा करून तात्काळ निर्णय घेऊ असे आश्वासित केले आहे. तरी बीड शहर बचाव मंचाच्या शिष्टमंडळाने यासंदर्भामध्ये जिल्हाधिकारीना असे निवेदन केले आहे



की, जिल्हाधिकारी साहेब आपण नियोजन समितीच्या माध्यमातून बऱ्याच वर्षांपासून व खूपच काळ प्रलंबित राहिलेल्या धानोरा रोड साठी प्राधान्यक्रम देऊन नव निर्मिती साठी व त्यासंदर्भातील मंजुरींसाठी सहकार्य केलेले आहे. तरी वस्तुस्थिती अन्वये धानोरा रोड हा बीड शहराला नूतन मुख्य रेल्वे स्थानकाला तसेच अनेकानेक गाव खेड्यांना जोडणारा मुख्य रस्ता आहे. याच रस्त्यावर नऊ ते दहा शाळा–विद्यालये आहेत. तसेच शहराच्या वाढत्या विस्ताराबरोबरच वाढत्या लोकसंख्येप्रमाणे धानोरा रोड वरून मोठे दळणवळण दररोज होत असते. धानोरा रोड वरून होणाऱ्या दैनंदिन रहदारीच्या गरजेनुसार या रस्त्याचे नवनिर्माण भक्कम पद्धतीचे, दर्जेदार व पुरेशा रुंदीकरणासह होणे गरजेचे आहे. तरी स्थानिक जनतेच्या व रहदारीच्या गरजेनुसार या रस्त्याचे निर्माण कमीत कमी ५० फूट रुंदीकरणासह करण्यात यावे तसेच यासाठी लागणारा वाढीव निधी तात्काळ मंजूर करून देण्यात यावा अशी मागणी करण्यात येत आहे. सद्यपरिस्थितीमध्ये उपलब्ध करून दिलेल्या निधीमध्ये पन्नास फूट रुंदीकरणासह रस्त्याचे काम सुरू करण्यात यावे व सुरुवातीपासूनच ५० फूट रस्त्याचे निर्माण करण्यात यावे. अशा प्रकारे केलेले रस्त्याचे निर्माण हे प्रदीर्घकाळ उपयोगी ठरणारे तसेच वाढत्या विस्ताराच्या दृष्टीने सोयीचे ठरणार आहे. अशी मागणी स्थानिक जनता व बीड शहर बचाव मंचाच्या वतीने करण्यात येत आहे. याच अनुषंगाने स्थानिक जनता व बीड शहर बचाव मंच, केलेली मागणी पूर्ण न झाल्यास आंदोलनाचा इशारा देत आहे. यावेळी शिष्टमंडळामध्ये प्राचार्य कॉ.डी.जी तांदळे , अध्यक्ष नितीन जायभाये, प्राचार्य कॉ. राजकुमार कदम सर, रणरागिनी प्रतिष्ठानच्या आम्रपाली साबळे, पत्रकार संपादक साहस आदोडे, बाजीराव ढाकणे, शिवसेनेचे रतन गुजर, एस.डी.पी.आय पार्टीचे तखियोद्दिन काझी, कलीमभाई फारोकी, डॉ संजय तांदळे, रामधन जमाले,अनिल बारगजे,नितीन वाघमारे यांची प्रमुख उपस्थिती होती.

# परभणी महानगरपालिका निवडणूक : तरुणांचा निर्धार

## नोट भी देंगें, वोट भी देंगे

दैनिक वादळ वार्ता

**परभणी । प्रतिनिधी**

आधुनिक भारतीय लोकशाहीला समृद्ध करण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आम्हाला सर्वश्रेष्ठ संविधान प्रदान केले. त्यांनी दिलेल्या मताधिकारामुळेच नवीन पीढीला ही परिवर्तन घडविण्याचं हत्यार मिळालं आहे. परभणी महानगरपालिका मध्ये पहिल्यांदाच मताधिकार बजावणारे तरूण बाळासाहेबांची संवैधानिक चळवळ पुढे नेणार आहेत. ते ही कृतीमधून अर्थात... नोट भी देंगें, वोट भी देंगे हा आत्माभिमान जागृत ठेऊन वैद्यकीय शास्त्राचा विद्यार्थी डॉ. हंसराज सुरेश शेळके, प्रभाग–५ ने आपल्या खाऊचा पैसा बचत करून आपले प्रेरणास्थान ड. बाळासाहेब आंबेडकर यांना १०,०००/–रुपयाची छोटीशी आर्थिक मदत सुपुर्द केली आहे. त्या सोबतच हंसराज ने डॉ. बाबासाहेबांच्या चळवळीचे स्वातंत्र्य पूर्वकालीन मुखपत्र 'साप्ताहिक जनता' चा संकलीत ग्रंथ संविधान रक्षक ड. बाळासाहेब आंबेडकरांना जनतेच्या साक्षीने भेट देत आम्ही सर्व तरुण आपल्या चळवळीत सक्रिय राहण्याचे अभिवचन



दिले आहे. याप्रसंगी राज्य उपाध्यक्ष प्रा. नागोराव पांचाळ, राज्य प्रवक्ते तैय्यब जफर, प्रदेश नेते तथा प्रशिक्षक डॉ. सुरेश शेळके, महानगराध्यक्ष मुदस्सीर असरार, उत्तर जिल्हाध्यक्ष प्रमोद कुटे, दक्षिण जिल्हाध्यक्ष मनोहर वावळे, महिला आघाडी अध्यक्षा सुनीता साळवे, संपादक प्रमोद अंभोरे, रंजित मकरंद, धम्मपाल सोनटक्के, अतुल वैराट, प्रीतम खंदारे व इतर मान्यवर उपस्थित होते.

# बीड जिल्हा काँग्रेस कमिटीची बीड येथे ८ जानेवारी रोजी बैठक

दैनिक वादळ वार्ता

**केज । प्रतिनिधी**

बीड जिल्हा काँग्रेस कमिटीची बैठक दि.८ जानेवारी गुरुवार रोजी सकाळी ११ वाजता बीड येथे होणार आहे.अखिल भारतीय काँग्रेस कमिटी सचिव तथा मराठवाडा सहप्रभारी श्रीमती रेहाना चिस्ती यांच्या मार्गदर्शना खाली ही बैठक महिला महाविद्यालयात संपन्न होत असून या बैठकीस महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस तथा पिंपरी चिंचवड निवडणुकीचे प्रभारी श्री. आदित्य दादा पाटील व बीड जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष श्री. राहुल भैया सोनवणे हे उपस्थित राहणार आहेत. या बैठकीनंतर जिल्हाधिकारी कार्यालया समोर मनरेगा बाबत केंद्र सरकारने पारित केलेल्या चुकीच्या कायद्याच्या विरोधात आंदोलन करण्यात येणार आहे या बैठकीस सर्व आजी माजी,पदाधिकारी, लोकप्रतिनिधिंनी उपस्थित राहण्याचे आवाहन बीड जिल्हा काँग्रेस कमिटीचे उपाध्यक्ष प्रवीणकुमार शेप यांनी केले आहे.

# परळी ग्रामीण पोलीस ठाणे हद्दीत चंदन तस्करीवर मोठी कारवाई; ८.२१ लाखांचा मुद्देमाल जप्त

## ७ आरोपी ताब्यात सहाय्यक पोलीस अधीक्षक ऋषिकेश शिंदे यांच्या पथकाची कारवाई

दैनिक वादळ वार्ता

**परळी । प्रतिनिधी**

दि. ०५.०१.२०२६ रोजी सायंकाळी १९.०० वाजताचे सुमारास श्री. ऋषिकेश शिंदे सहायक पोलीस अधीक्षक, अंबाजोगाई यांना गोपनीय बातमीदारामार्फत खात्रीलायक माहिती मिळाली की, मौजे धर्मापुरी ते पानगाव रस्त्याच्या डाव्या बाजूस असलेल्या गायराण जमिनीत काही इसम प्रतिबंधित चंदनाची बेकायदेशीर खरेदी–विक्री व वाहतूक करत आहेत.सदर माहितीच्या आधारे सहा. पोलीस अधीक्षक श्री. ऋषीकेश शिंदे यांनी त्यांचे पथक तात्काळ रवाना करुन रात्री २१.०० वाजताचे सुमारास मिळालेल्या माहितीच्या ठिकाणी अचानक छापा टाकला.छाप्यात पुढील आरोपी विनापरवाना बेकायदेशीररित्या चंदनाची तस्करी करताना मिळून आले : १. पप्पु बाबुराव सूर्यवंशी (वय ४०) २. राहुल पप्पु सूर्यवंशी (वय २३) ३. तेजस कल्लप्पा कांळीबे (वय २५) (रा. अशोक नगर, परळी वै., जि. बीड)



४. नितीन सटवा जाधव (वय २२), रा. हनुमान नगर, परळी वै., जि. बीड ५. अविनाश व्यंकट जाधव (वय २३) ६. व्यंकट रामचंद्र जाधव (वय ४५) (दोन्ही रा. फुलेनगर, उदगीर, जि. लातूर) ७. भारत निवृत्ती गायकवाड (वय ४०), रा. नाकलगाव, ता. माजलगाव, जि. बीड.१०४ किलो (किंमत ३,००,०००/–, चार अंदाजे ६१,०००/–, आरोपींच्या ताब्यातुन पुढील प्रमाणे मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. चंदन लाकूड २,६०,०००/–), चंदन साल ३९ किलो (किंमत ३९,०००/–), टाटा इंडिगो चारचाकी कार दुचाकी वाहने – अंदाजे १,६०,०००/–, एक विनानंबर दुचाकी २०,०००/–, ७ मोबाईल फोन लोखंडी तराजू व वाकस १,०००/– असा एकुण मुद्देमाल किंमत ८,२१,०००/– प्रमाणे पंचर्चासमक्ष जप्त करण्यात आला आहे.पोलीस अंमलदार २१६९ सतेश कांगणे यांचे फिर्यादीवरुन आरोपींविरुद्ध पोलीस स्टेशन परळी ग्रामीण येथे गुन्हा रजि. क्रमांक १२/२०२६ भारतीय न्याय संहिता कलम ३०३(२), ३१७(२), ३(५) अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.सदरची कारवाई पोलीस अधीक्षक श्री. नवनीत काँवत, अपर पोलीस अधीक्षक चेतना तिडके, सहा. पोलीस अधीक्षक ऋषीकेश शिंदे यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक असद शेख (अंबाजोगई ग्रामीण), पोलीस उपनिरीक्षक निमोने (परळी ग्रामीण), पोह. बासर, बिक्कड (अंबा. ग्रामीण), उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालयातील पोह. सतेश कांगणे यांनी केली आहे.

## वादळी कट्टा

### स्वच्छता विकासाची अस्वच्छता

गावात मोठ्ठा कार्यक्रम – स्वच्छता विकास अभियान
मंचावर पांढरे कपडे, भाषणांचा तुफान.
माईकवर घोषणा – घाणमुक्त भारत!
आणि बाजूलाच पडलेले चहाचे ग्लास, पाणी बाटल्या
आगोदरच लाजरत!
पोस्टरवर चमचमीत झळकत झिरो कचरा योजना
पण रांगेत उभा कचरा म्हणे – माझंच राज्य ना!
रोड स्वच्छतेचं सेल्फी, फ्लॅश लाईटचा बरसाट,
सेल्फी झाल्यावर झाडूही घेतो सुट्टी, हा खरा विकासाचा
थाट!
सभेत चर्चा – शौचालय सर्वांच्या दारी
प्रत्यक्षात कुलूप तुटलेले, पाणी नाही – भारी!
अहवालात हिरवे टिकमार्क, जमिनीवर पिवळी निशाणी,
कागदावर स्वच्छता नंबर वन, वास्तवात मात्र तीच कहाणी!
शेवटी कचरा, खड्डे, धूर सगळेच उघडे
स्वच्छतेच्या फलकावरच पक्ष्यांचे घरटे!
विकास बाई म्हणतात – मी येतेय, जरा वाट पाहा
आणि अस्वच्छता हसून म्हणे – इकडेच आहे गं, ये ना!

# संपादकीय

## देशातील पहिला वन्य जीव सुरक्षित महामार्ग

मध्य प्रदेशमधील घनदाट नौरादेही येथील वीरांगना राणी दुर्गावती व्याघ्र प्रकल्पातून जाणारा भोपाळ-जबलपूर हा राष्ट्रीय महामार्ग ४५ देशांतील पहिला वन्यजीव-सुरक्षित महामार्ग ठरला आहे. या महामार्गाच्या बांधकामात रस्त्यावर पाच मिलिमीटर जाडीचे 'रेड टेबल-टॉप ब्लॉक मार्किंग' लावण्यात आले आहेत. केवळ चालकांचा वेग कमी करणे हा यामागील उद्देश नसून वन क्षेत्रात राहणाऱ्या वन्यजीवांची सुरक्षितता सुनिश्चित केली जात आहे.
मध्य प्रदेशमधील नौरादेही व्याघ्र प्रकल्पातून जाणाऱ्या महामार्गाचा सुमारे ११.९६ किलोमीटरचा भाग दोन आणि चार लेनमध्ये विकसित करण्यात आला आहे. सुमारे दोन किलोमीटर लांबीच्या संवेदनशील वन्यजीव क्षेत्रात हे 'रेड टेबल-टॉप मार्किंग' बसवण्यात आले आहेत. एखादे वाहन या लाल ब्लॉकवरून जाते, तेव्हा चालकाला थोडासा धक्का बसतो. त्यामुळे तो त्याचा वेग कमी करतो. लाल रंग आधीच धोक्याचा सिग्नल मानला जातो, म्हणून हे तंत्रज्ञान चालकांच्या मानसशास्त्रावरदेखील परिणाम करते. भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण (एनएचएआय)च्या अधिकाऱ्यांच्या मते, वेगाने येणाऱ्या वाहनांमुळे या भागात हरिण, नीलगाय आणि इतर वन्यजीवांचे रस्ते अपघात पूर्वी सामान्य झाले होते. हा भाग धोकादायक क्षेत्र मानला जात होता. त्यावर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी आंतरराष्ट्रीय मानके लक्षात घेऊन हे नवीन तंत्रज्ञान स्वीकारण्यात आले. रस्त्याच्या दोन्ही बाजूला फक्त 'रेड टेबल-टॉप मार्किंग'च नाही तर पाच मिलिमीटर जाडीच्या पांढऱ्या पेव्हर शोल्डर लाइन्सदेखील तयार करण्यात आल्या आहेत. एखादे वाहन रस्त्यावरून घसरले किंवा चालक झोपला तर त्यांना सतर्क करण्यासाठी त्वरित कंपनांचा वापर केला जातो. शिवाय प्राणी सुरक्षितपणे रस्ता ओलांडू शकतील, यासाठी २५ वन्यजीव अंडरपास बांधण्यात आले आहेत. या तंत्रज्ञानाच्या अंमलबजावणीपासून येथे एकही अपघात किंवा वन्यजीवांना दुखापत झाल्याचे वृत्त नाही. वीरांगना राणी दुर्गावती व्याघ्र प्रकल्प हा मध्य प्रदेशमधील सर्वात मोठा व्याघ्र प्रकल्प आहे. हा परिसर भारतीय लांडगा, पँथर, जंगली कुत्रा, कोल्हा, राखाडी कोल्हा आणि ओटर यांसारख्या अनेक दुर्मीळ वन्यजीव प्रजातींसाठी एक प्रमुख अधिवास आहे. २०१८ मध्ये राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्रकल्पात त्याचा समावेश करण्यात आला होता आणि वाघांची संख्या आता २६ वर पोहोचली आहे. केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी एक्सवर पोस्ट केले, की विकास आणि पर्यावरण यांच्यातील संतुलन आणि वन्यजीवांचे संरक्षण लक्षात घेऊन भारतात प्रथमच महामार्गांवर पाच मिलिमीटर लाल 'रेड टेबल-टॉप ब्लॉक मार्किंग'चा वापर करण्यात आला आहे. २०१८ मध्ये या जिल्ह्याचा राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्रकल्पात समावेश करण्यात आला. येथे चितळ, चिंकारा आणि नीलगाय यांचीही संख्या वाढत आहे. काळविटांनादेखील संरक्षित क्षेत्रात सोडण्यात आले आहे. त्यामुळे मांसाहारी प्राण्यांना नैसर्गिक अन्न चक्र मिळते. नौरादेही व्याघ्र प्रकल्प सागर, दमोह आणि नरसिंहपूर या तीन जिल्ह्यांमध्ये पसरला आहे. मध्य प्रदेशची राजधानी भोपाळला सांस्कृतिक राजधानी जबलपूरशी जोडणारा राष्ट्रीय महामार्ग ४५ चा एक महत्त्वाचा भाग आता देशभरात महामार्ग अभियांत्रिकी आणि वन्यजीव संवर्धनाचे एक मॉडेल बनला आहे. भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, प्रकल्प अंमलबजावणी युनिटने नरसिंहपूर आणि जबलपूरमधील सुमारे बारा किलोमीटरच्या अत्यंत संवेदनशील भागाचे संरक्षण करण्यासाठी अभूतपूर्व आणि नावीन्यपूर्ण तंत्रांचा वापर केला आहे. हा भाग वीरांगना दुर्गावती व्याघ्र प्रकल्पाच्या (पूर्वी नौरादेही वन्यजीव अभयारण्य) सीमेवरून जातो. वन्यजीवांच्या वावरामुळे आणि डोंगराळ प्रदेशामुळे हा भाग पूर्वी एक अपघात-प्रवण क्षेत्र मानला जात होता. महामार्ग चौकापासून बेलखेडापर्यंत असंख्य अपघात होत असत. त्यामुळे प्रवासी आणि वन्यजीव दोघांसाठीही सुरक्षित कॉरिडॉर सुनिश्चित करण्यासाठी १२२.२५ कोटी खर्चाच्या ११.९६ किलोमीटर प्रकल्पात विशेष उपाययोजना राबवण्यात आल्या आहेत. सुमारे १२ किलोमीटर लांबीच्या रस्त्यावर पाच मिलिमीटर जाडीचे उंच लाल मार्किंग लावण्यात आले आहे. एखादे वाहन त्यातून जाते, तेव्हा हलकासा धक्का निर्माण करते. त्यामुळे चालक आपोआ०प वेग कमी करतो. रस्त्यावरून जाणाऱ्या स्थानिक रहिवाशांनी सौंदर्य आणि सुरक्षिततेमुळे त्याला 'रेड कार्पेट' असे टोपणनाव दिले आहे. येथे वन्य प्राण्यांची सुरक्षित हालचाल सुनिश्चित करण्यासाठी २५ अंडरपास बांधण्यात आले आहेत. त्यामुळे त्यांना महामार्गाच्या एका बाजूकडून दुसऱ्या बाजूला धोका न घेता जाता येते. येथे वन्यजीवांना रस्ता ओलांडण्यापासून रोखण्यासाठी संपूर्ण संवेदनशील भागात 'चेन-लिंक' कुंपण बसवण्यात आले आहे. रात्रीच्या अपघातांवर नियंत्रण ठेवण्यासाठी आणखी एक महत्त्वाचे पाऊल उचलण्यात आले आहे. रस्त्याच्या दोन्ही बाजूंना पाच मिलिमीटर जाडीची पांढरी खांद्याची रेषा तयार करण्यात आली आहे. चालक झोपेमुळे किंवा दुर्लक्षामुळे मार्गावरून दूर जायला लागला, तर ही रेषा लगेचच तीव्र धक्का देऊन त्याला सावध करते. या प्रकल्पाचे उद्दिष्ट प्रवासी आणि वन्यजीवांसाठी सुरक्षित प्रवास सुनिश्चित करणे हे आहे. भविष्यात हा महत्त्वाचा मार्ग पुन्हा कधीही 'ब्लॅक स्पॉट' बनू नये, याची दखल घेण्यात आली आहे. देशासाठी हा महामार्ग सुरक्षेचे एक अनुकरणीय मॉडेल आहे. जंगली क्षेत्रातून जाणारा आणि डोंगर कापून बांधलेला हा रस्ता तीव्र वळणाचा आहे. यावर उपाय म्हणून 'स्पीड डिटेक्टर' बसवण्यात आले आहेत आणि रस्त्याला लाल रंग देण्यात आला आहे. त्याला 'टेबलटॉप रेड मार्किंग' म्हणतात.या उपक्रमामुळे विकास आणि पर्यावरण संरक्षण हातात हात घालून जाऊ शकतात, हे दिसते. रस्ते बांधणीसोबतच प्राण्यांच्या सुरक्षिततेचा विचार करणे महत्त्वाचे आहे. भोपाळ-जबलपूर महामार्गावर सुरू करण्यात आलेले हे 'रेड टेबलटॉप मार्किंग' भारतातील रस्ते सुरक्षा आणि वन्यजीव संवर्धनासाठी एक नवीन उदाहरण ठरू शकते. ते यशस्वी झाल्यास देशभरातील इतर संवेदनशील महामार्गांवरही लागू केले जाऊ शकते. हा लाल रस्ता 'स्पीड ब्रेकर'पेक्षा वेगळा आहे. तो सामान्य स्पीड ब्रेकर किंवा रंबल स्ट्रिपसारखा नाही. तो थोडा उंचावलेला आहे आणि दुरून स्पष्टपणे दिसतो. असे असले, तरी अनेक लोकांना भीती वाटते, की वेगळ्या रंगाचा रस्ता 'एडीएएस' प्रणालीला गोंधळात टाकू शकतो. हा लाल रस्ता दुबईच्या शेख झायेद रस्त्याचे अनुकरण आहे. शेख झायेद रस्त्यावर विशिष्ट भागात स्पष्ट रंगीत खुणा आहेत. त्यामुळे अपघात कमी झाले आहेत. भारतातील या प्रयोगातून रस्ते आता केवळ वाहनांसाठीच नव्हे तर मानव, प्राणी आणि पर्यावरण लक्षात घेऊन बांधले जात आहेत, असे दिसून येते. रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयाच्या मते, हा प्रकल्प पर्यावरण मित्रत्व, सार्वजनिक सुरक्षा आणि वन्यजीव संरक्षणाच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल आहे. त्यामुळे लाल रस्ता धोक्याचा नव्हे, तर बुद्धिमान डिझाइनचे प्रतीक ठरत आहे.

# वृत्तपत्रांचा प्रवास : बदलत्या काळाचा वेध

बदल हा जीवनाचा स्थायी नियम आहे. काळ बदलतो, समाज बदलतो, विचार बदलतात आणि त्या प्रत्येक बदलाच्या केंद्रस्थानी उभे राहून समाजाला दिशा देणारी एक शक्ती म्हणून पत्रकारिता कार्यरत राहिली आहे. भारतीय पत्रकारितेचा हा प्रवास केवळ बातम्यांचा नाही, तर स्वातंत्र्यलढ्याचा, राष्ट्रनिर्मितीचा आणि लोकशाही घडवण्याचा इतिहास आहे.
या परंपरेची ठोस सुरुवात १८३२ साली सिंधुदुर्ग जिल्ह्यात जन्मलेल्या बाळशास्त्री जांभेकर यांनी 'दर्पण' हे पहिले मराठी वृत्तपत्र सुरू करून केली. अज्ञान, अंधश्रद्धा आणि सामाजिक विषमतेने ग्रासलेल्या समाजात त्यांनी लेखणीच्या बळावर जनजागृतीचा दीप प्रज्वलित केला. पत्रकारिता ही केवळ बातम्यांचे साधन नसून समाजपरिवर्तनाचे प्रभावी माध्यम असू शकते, हे त्यांनी कृतीतून सिद्ध केले. दर्पण दिनाच्या निमित्ताने हा लेख त्या महान कार्याला विनम्र अभिवादन आहे.
ब्रिटिश राजवटीत पत्रकारिता ही स्वातंत्र्यलढ्याची रणभेरी ठरली. लोकमान्य टिळकांनी 'केसरी' आणि 'मराठा'मधून स्वराज्याचा विचार घराघरांत पोहोचवला. गो. ग. आगरकर, अण्णासाहेब चिपळूणकर, गणेशशंकर विद्यार्थी, बाबूराव विष्णु पराडकर, सुरेंद्रनाथ बॅनर्जी यांनी समाजसुधारणेची मशाल उंचावली.
महात्मा गांधींनी 'Young India' आणि "Navajivan'मधून स्वातंत्र्यलढ्याला नैतिक अधिष्ठान दिले, तर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 'मूकनायक', 'बहिष्कृत भारत' आणि 'जनता'मधून दलित-वंचित समाजाला आवाज दिला.
सेन्सॉरशिप, संपादकांवर खटले, छापखाने जप्ती आणि तुरुंगवास असूनही लेखणी झुकली नाही. हा काळ भारतीय पत्रकारितेचा सुवर्णकाळ मानला जातो.
स्वातंत्र्यानंतर पत्रकारितेवर नवी जबाबदारी आली - स्वातंत्र्याची मूल्ये रुजवणे आणि राष्ट्र उभारणीला दिशा देणे. पंचवार्षिक योजना, औद्योगिकीकरण, सहकार चळवळ, शिक्षणविस्तार, ग्रामीण विकास यांचे वृत्तांकन सामान्य माणसापर्यंत पोहोचवण्याचे कार्य माध्यमांनी केले.



रामनाथ गोयनका (इंडियन एक्सप्रेस), कुलदीप नायर, भाऊ महाजन, प्रभाकर पाध्ये यांसारख्या पत्रकारांनी लोकशाहीचा पाया मजबूत केला.१९७५ च्या आणीबाणीच्या काळात भारतीय पत्रकारितेची खरी कसोटी झाली. सेन्सॉरशिप, धमक्या, अटकसत्र असतानाही इंडियन एक्सप्रेस, द स्टेट्समन, आनंदबाजार पत्रिका, लोकसत्ता, सकाळ, केसरी यांनी निर्भीड भूमिका घेत लोकशाहीचे रक्षण केले.
आजचे माध्यमविश्व पूर्णपणे बदलले आहे. इंटरनेट, स्मार्टफोन, सोशल मीडिया, डिजिटल पोर्टल्स, युट्यूब आणि पॉडकास्ट्समुळे माहितीचा वेग व प्रभाव अकल्पनीय वाढला आहे. आज तक, झी न्यूज, एनडीटीव्ही, टीव्ही९, एबीपी, तसेच मराठीत सकाळ, लोकसत्ता, लोकमत, महाराष्ट्र टाइम्स, सामना ही माध्यमे जनमत घडवण्यात महत्त्वाची भूमिका बजावत आहेत.
डिजिटल पत्रकारितेमध्ये ढहश थळीश, ढहश टींळपीं, डलीश्रश्र, छशुीश्ररींपवी यांसारखे प्लॅटफॉर्म्स उदयास आले.
या वाढीसोबतच समस्या वाढल्या - फेक न्यूज, ट्रोल संस्कृती, टीआरपी स्पर्धा, राजकीय व कॉर्पोरेट दबाव. तरीही राजदीप सरदेसाई, शेखर गुप्ता, कुमार केतकर, निखिल वागळे यांसारखे पत्रकार लोकशाहीचे प्रश्न सातत्याने उपस्थित करत आहेत.
ग्रामीण पत्रकारिता आजही भारताचा खरा आरसा आहे. गावातील पाणी, शेती, स्थलांतर, आरोग्य, शिक्षण, रोजगार - हे खरे राष्ट्रीय प्रश्न आहेत आणि त्यांना मुख्य प्रवाहात आणण्याचे कार्य स्थानिक पत्रकार करीत आहेत.
भविष्यातील पत्रकारिता अधिक तंत्रसक्षम होईल. कृत्रिम बुद्धिमत्ता, डेटा पत्रकारिता, ऑटोमेशन, ब्लॉकचेन व्हेरिफिकेशन यांचा वापर वाढेल. मात्र तंत्रज्ञान कितीही प्रगत झाले तरी पत्रकारितेचा आत्मा - सत्य, निर्भीडता आणि समाजहित - कायम राहायला हवा.
भविष्यात वाचक अधिक सजग होईल. तो स्रोत तपासेल, संदर्भ मागेल आणि विश्वासार्हतेला महत्त्व देईल. त्यामुळे दर्जेदार, मूल्याधिष्ठित पत्रकारितेचे महत्त्व अधिक वाढेल.
एकूणच पाहता, पत्रकारिता म्हणजे केवळ व्यवसाय नाही; ती समाजाचा विवेक आहे, लोकशाहीचा कणा आहे आणि राष्ट्राच्या प्रगतीची दिशा ठरवणारी शक्ती आहे. बाळशास्त्री जांभेकरांनी पेटवलेली लेखणीची ज्योत आजही तेवढ्याच तेजाने उजळत आहे. अनेक संकटे, बदल आणि आव्हाने येऊनही माध्यमांनी समाजाची साथ सोडलेली नाही.
दर्पण दिनाच्या निमित्ताने एवढीच अपेक्षा - माध्यमे सदैव निर्भीड, निष्ठावान आणि समाजाचा दीपस्तंभ म्हणून उजळत राहोत.

**-डॉ. भारत कऱ्हाड, प्राचार्य, वराडकर महाविद्यालय दापोली, जिल्हा रत्नागिरी.**

# भारत देशाचे तुम्ही भावी आधार स्थंभ आहात-आदर्श शिक्षक नरहरी काकडे






**दैनिक वादळ वार्ता**
**केज । प्रतिनिधी**

तालुक्यातील कानेश्वर विद्यालय,कानडीमाळी.या विद्यालयात इयत्ता दहावी वर्गाच्या वतीने स्वंय शासन दिन साजरा करण्यात आला.आजच्या स्वंय शासन दिनानिमित्त मुख्याध्यापक म्हणून कु.स्पनाली खाडे तसेच लिपीक म्हणून स्नेहल सांजुरे तर सेवक म्हणून श्रीनिवास खाडे यांनी काम पाहिले. आजच्या या स्वंय शासन दिन कार्यास मार्गदर्शन कानेश्वर. विद्यालयाचे मुख्याध्यापक संतोष गरडे यांनी केले.
स्वंय शासन दिन या कार्यक्रमाच्या प्रसंगी मार्गदर्शन करत असताना आदर्श शिक्षक नरहरी काकडे असे म्हटले की तुम्ही सर्व विद्यार्थी व विद्यार्थीनी यांनी आजच्या कार्यक्रमाचे नियोजन हे एकदम चांगल्या प्रकारे केले .त्याच प्रमाणे तुम्ही चांगला अभ्यास करा जास्तीत जास्त चांगले गुण घ्या.आणि तुमचं तुमच्या कुटुंबाच तुमच्या शाळेचे तुमच्या गावाचं नाव उज्जवल करा.या कार्यक्रमा प्रसंगी माझ्या वतीने मी तुम्हांला सर्वांना शुभेच्छा देतो .या वेळी उपस्थित कानेश्वर विद्यालयाचे मुख्याध्यापक संतोष गरडे आदर्श शिक्षक अनंत गवळी . अरुण गिते,सिध्दार्थ राऊत,आत्माराम राऊत इत्यादी उपस्थित होते.या स्वंय शासन दिन कार्यक्रमास कानेश्वर विद्यालयातील सर्व विद्यार्थी व विद्यार्थीनी यांनी मोठ्या प्रमाणात सहभाग नोंदवला व हा कार्यक्रम यशस्वी केला .

# तुमच्या डोळ्यांचे सौंदर्य वाढवण्यासाठी घरी अशाप्रकारे बनवा वॉटरप्रूफ काजळ

**दैनिक वादळ वार्ता**

मेकअप लूक पूर्ण करण्यासाठी काजळ लावणे महत्वाचं आहे. कारण काजळ तुमचे डोळे केवळ सुंदरच बनवत नाही तर डोळ्यांवरील घाण साफ करण्यासाठी देखील चांगले मानले जाते. तथापि बाजारात उपलब्ध असलेल्या बहुतेक काजळांमध्ये केमिकल वापरले जाते. तर हे केमिकलयुक्त काजळ केवळ डोळे स्वच्छ करत नाहीत तर डोळ्यांना जळजळ होणे, खाज सुटणे यासारख्या समस्या देखील निर्माण करतात. बरेचजण वॉटरप्रूफ काजळच्या नावाखाली महागडे काजळ खरेदी करतात, परंतु त्यातील केमिकल हे संवेदनशील डोळ्यांसाठी हानिकारक ठरू शकतात.
त्यामुळे सर्वात चांगली आणि सुरक्षित पद्धत म्हणजे घरीच घरगूती पद्धतीने काजळ बनवणे. जर तुमचे डोळे संवेदनशील असतील आणि तुम्ही रोज तुमच्या डोळ्यांना काजळ लावत असाल तर हा लेख तुमच्यासाठी आहे. तर आजच्या लेखात आपण घरी काजळ बनवण्याची आयुर्वेदिक पद्धत जाणून घेणार आहोत, जी वॉटरप्रूफ आहे आणि तुमच्या डोळ्यांना नुकसान पोहोचवणार नाही.



**घरगुती काजळ कसे बनवायचे?**
घरगुती काजळ बनवण्यासाठी, प्रथम एक दिवा किंवा एक लहान स्टीलची वाटी घ्या. त्यात शुद्ध तूप किंवा नारळाचे तेल मिक्स करा. कापसाची वात थोड जाड ठेवा आणि ती पेटवा. आता एक स्वच्छ स्टीलची प्लेट किंवा वाटी दिव्यावर उलटी ठेवा जेणेकरून त्यातून निघणारा धुर त्या प्लेटवर जमा होईल. काही वेळाने प्लेटवर काळी काजळी जमा होईल. हे स्वच्छ चमच्याने काढा आणि त्यात १२ थेंब शुद्ध तूप किंवा बदाम तेल टाका आणि चांगले मिक्स करा. तुमचे नैसर्गिक आणि केमिकलमुक्त घरगुती काजळ तयार आहे.
**घरगुती काजळाचे फायदे**
घरगुती काजळ पूर्णपणे नैसर्गिक आहे, त्यामुळे डोळ्यांना जळजळ, खाज सुटणे किंवा लालसरपणा येत नाही. त्यात असलेले तूप किंवा तेल डोळ्यांना थंड करते आणि ओलावा टिकवून ठेवते. नियमितपणे आणि योग्यरित्या लावल्यास घरगुती काजळ डोळ्यांजवळील कोरडेपणा टाळतो आणि अनेकांच्या मते डोळ्यांचा थकवा कमी करण्यास मदत करतो. हे घरगुती काजळ केमिकल काजळांपेक्षा संवेदनशील डोळे आणि मुलांसाठी ते सुरक्षित मानले जाते.
**घरगुती काजळ कसे लावायचे**
घरगुती काजळ लावण्यापूर्वी तुमचे हात आणि डोळ्यांभोवतीचा भाग पूर्णपणे स्वच्छ करा. स्वच्छ काजळाची काडी, कापसाचा गोळा किंवा बोट वापरून, थोडेसे काजळ घ्या आणि ते पापण्यांच्या रेषेवर हळूवारपणे लावा. जास्त काजळ लावल्याने ते पसरू शकते, म्हणून कमी प्रमाणात काजळ लावणे चांगले.

# वयाची ५० शी ओलांडल्यानंतर आहारात या पदार्थांचा करा समावेश

**दैनिक वादळ वार्ता**

५० वर्षांनंतर शरीराच्या गरजा आणि पचनशक्तीमध्ये बदल होतात, त्यामुळे या वयात निरोगी व संतुलित आहार घेणे अत्यंत गरजेचे ठरते. या टप्प्यावर मेटाबॉलिझम मंदावतो, स्नायूंची ताकद कमी होते आणि हाडे कमजोर होण्याची शक्यता वाढते. म्हणून आहारात प्रथिने, कॅल्शियम, फायबर, जीवनसत्त्वे आणि खनिजे यांचा समतोल राखणे आवश्यक आहे. दूध, दही, ताक, पनीर यांसारखे कॅल्शियमयुक्त पदार्थ नियमित घ्यावेत, जे हाडे व दात मजबूत ठेवण्यास मदत करतात. डाळी, कडधान्ये, अंकुरित धान्य, सोयाबीन, अंडी किंवा मासे यांसारख्या प्रथिनयुक्त पदार्थांचा समावेश केल्यास स्नायूंची ताकद टिकून राहते. ५० नंतर पचनसंस्था थोडी कमजोर होत असल्याने फायबरयुक्त आहार महत्त्वाचा ठरतो.भाजीपाला, फळे, संपूर्ण धान्य, ओट्स, ज्वारी, बाजरी, भाजीपाला यामुळे पचन सुधारते आणि बद्धकोष्ठता टाळता येते. हिरव्या पालेभाज्यांमधून लोह, फोलेट आणि अँटिऑक्सिडंट्स मिळतात, जे रक्तनिर्मिती आणि रोगप्रतिकारक शक्तीसाठी उपयुक्त असतात. साखर, मीठ आणि तेलाचे प्रमाण मर्यादित ठेवावे, कारण या वयात मधुमेह, रक्तदाब आणि हृदयविकाराचा धोका वाढतो. तळलेले, प्रक्रिया केलेले आणि फास्ट फूड टाळणे आरोग्यासाठी फायदेशीर ठरते. पुरेसे पाणी पिणे हा निरोगी आहाराचा महत्त्वाचा भाग आहे. तहान न लागली तरी नियमित अंतराने पाणी प्यावे.कडधान्यांची उसळ, सूप, फळांचे रस, ताक यांचा वापर करावा. तसेच व्हिटॅमिन डी, व्हिटॅमिन बी१२ आणि ओमेगा-३ फॅटी ॲसिड्स यांची कमतरता होऊ नये याकडे लक्ष द्यावे. आहारासोबत हलका व्यायाम, चालणे, योग आणि ध्यान केल्यास शरीर तंदुरुस्त राहते. योग्य आणि संतुलित आहार घेतल्यास ५० नंतरही आरोग्य, ऊर्जा आणि आत्मविश्वास टिकवून ठेवता येतो. वय ५० ही एक अशी अवस्था आहे जिथे पौष्टिकतेमध्ये थोडासा निष्काळजीपणा देखील जबरदस्त असू शकतो. या वयात शरीराच्या गरजा बदलू लागतात आणि आरोग्याकडे विशेष लक्ष देणे आवश्यक बनते. जर तुमचे वडीलही त्याच वयाचे असतील तर त्यांचा आहार बदलण्याची हीच योग्य वेळ आहे. आज आम्ही तुम्हाला अशा ५ गोष्टींबद्दल सांगणार आहोत ज्या तुम्ही तुमच्या वडिलांच्या आहारात समाविष्ट करू शकता, जेणेकरून त्यांची प्रतिकारशक्ती मजबूत होईल आणि सांधेदुखी, उच्च रक्तदाब आणि अशक्तपणा यासारख्या समस्या दूर होतील. फिटनेस कोच नवनीत रामप्रसाद यांनी त्यांच्या इन्स्टाग्राम हँडलवरून ही माहिती शेअर केली आहे. वयाच्या ५० व्या वर्षानंतर, स्नायूंचे नुकसान दरवर्षी वाढू लागते. हे सामर्थ्य, संतुलन आणि रक्तातील साखर नियंत्रणावर परिणाम करते. अनेक वडिलांना थकवा जाणवतो किंवा अशक्तपणा जाणवतो, पण ते त्याबद्दल उघडपणे बोलत नाहीत. अशा वेळी आहार आणि जीवनशैलीत बदल करणे खूप महत्वाचे ठरते.

**आहारात काय समाविष्ट करावे?**

**१. भिजवलेले मेथीचे दाणे**
सकाळी रिकाम्या पोटी रात्रभर भिजवून मेथीचे दाणे खाण्याचे अनेक फायदे आहेत. यामुळे रक्तातील साखर नियंत्रणात राहते, शरीराची जळजळ कमी होते आणि पुरुषांचे हार्मोनल आरोग्य नैसर्गिकरित्या सुधारते. आपण आपल्या वडिलांच्या आहारात त्यांचा समावेश केला पाहिजे.

**२. ओट्स आणि ग्रीक दही**
आपण आपल्या वडिलांच्या न्याहारीत चहा आणि बिस्किटेऐवजी ओट्स आणि ग्रीक दही समाविष्ट करू शकता. यामध्ये प्रथिने मुबलक प्रमाणात आढळतात, जे स्नायूंमध्ये सामर्थ्य टिकवून ठेवते. तसेच, त्यात असलेले फायबर पचन आणि पोटाचे आरोग्य सुधारण्यास मदत करते.

**३. नाचणी किंवा क्विनोआ वापरा**
वडिलांचे आरोग्य निरोगी ठेवण्यासाठी आपण त्यांच्या आहारात नाचणी किंवा क्विनोआचा समावेश करू शकता. हे लोह, मॅग्नेशियम आणि प्रथिने समृद्ध आहे. तसेच, या गोष्टी दीर्घकाळापर्यंत सामर्थ्य आणि तग धरण्याची क्षमता राखण्यात खूप उपयुक्त ठरतात.

**४. संध्याकाळच्या आहारात भाजलेल्या बियांचा समावेश करा**
संध्याकाळच्या स्नॅकसाठी आपण भोपळा, सूर्यफूल आणि फ्लेक्ससीड बियाणे हलके भाजून आपल्या वडिलांच्या आहारात समाविष्ट करू शकता. ते झिंक आणि मॅग्नेशियम समृद्ध आहेत, जे स्नायू आणि सांध्यासाठी फायदेशीर असल्याचे सिद्ध होते. त्यामध्ये असलेले निरोगी चरबी शरीराच्या पुनर्प्राप्ती आणि संप्रेरक संतुलनास मदत करतात.

**५. प्रथिनेयुक्त डिनर**
वयाच्या ५० व्या वर्षानंतर हलके आणि प्रथिनेयुक्त जेवण घेणे चांगले असते. यात १-२ पोळी, एक वाटी मूग डाळ आणि साध्या भाज्यांचा समावेश असू शकतो. माहितीसाठी जाणून घेऊया की रात्री प्रथिने खाल्ल्याने स्नायू दुरुस्त होतात. याशिवाय हलके रात्रीचे जेवण पचनासाठीही चांगले असते.

# नंदुरबारच्या दुर्गम भागात शैक्षणिक क्रांतीचे पडघम;आमची अभ्यासिका उपक्रमातून १२५ ज्ञानाची घरे पुन्हा फुलली!




दैनिक वादळ वार्ता

**नंदुरबार । दिपक गोसावी**

नंदुरबार जिल्ह्यातील ग्रामीण आणि आदिवासी भागातील गुणवंत विद्यार्थ्यांना आता स्पर्धा परीक्षांच्या तयारीसाठी शहरांकडे धाव घेण्याची गरज उरणार नाही. जिल्हा प्रशासनाच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या 'आमची अभ्यासिका - पुन्हा फुलले' या महत्त्वाकांक्षी उपक्रमामुळे जिल्ह्यातील तब्बल १२५ ग्रामीण वाचनालयांचा कायापालट झाला असून, ज्ञानाची ही बंद कपाटे आता विद्यार्थ्यांच्या भविष्यासाठी खुली झाली आहेत.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या पुढाकाराने सुरू झालेल्या या मोहिमेत केवळ पुस्तके उपलब्ध करून न देता, अभ्यासाचे एक 'मॉडेल' तयार करण्यावर भर देण्यात आला आहे. या उपक्रमांतर्गत निवडीत असलेल्या प्रत्येक अभ्यासिकेत विद्यार्थ्यांच्या गरजांचा सूक्ष्म विचार करण्यात आला आहे. यामध्ये विद्यार्थ्यांना तासनतास बसून अभ्यास करता येईल, अशा दर्जेदार बाकांची सोय. केवळ कथा-कादंबऱ्याच नव्हे, तर एमपीएससी,यूपीएससी आणि इतर स्पर्धा परीक्षांसाठी लागणारी महत्त्वाची संदर्भ पुस्तके. अभ्यासाला पूरक असे नकाशे आणि विविध शैक्षणिक तक्त्यांनी या अभ्यासिका सज्ज करण्यात आल्या आहेत. या उपक्रमाचे सर्वात मोठे यश म्हणजे यात लाभलेला लोकसहभाग. प्रशासनासोबतच स्थानिक ग्रामपंचायती, तरुण मंडळे आणि वाचनप्रेमी नागरिकांनी या मोहिमेत आपला सक्रिय सहभाग नोंदवला आहे. अनेक गावांमध्ये लोकसहभागातून या अभ्यासिकांची स्वच्छता आणि रंगरंगोटी करण्यात आली असून, प्रशासनाने दिलेले साहित्य तिथे पोहोचताच अभ्यासाचे वातावरण निर्माण झाले आहे. शहरातील महागड्या अभ्यासिकांची फी परवडत नसल्यामुळे अनेक ग्रामीण विद्यार्थी शिक्षणाच्या मुख्य प्रवाहातून मागे पडतात. मात्र, आता गावागावात 'आमची अभ्यासिका' उपलब्ध झाल्याने शांत, प्रेरणादायी आणि एकाग्रतेस पूरक वातावरण विद्यार्थ्यांना विनामूल्य मिळत आहे. यामुळे विद्यार्थ्यांमध्ये नियमित अभ्यासाची गोडी निर्माण होऊन त्यांचा बौद्धिक व वैयक्तिक विकास साधण्यास मोठी मदत होत आहे. या उपक्रमाबाबत बोलताना जिल्हा प्रशासनाने विश्वास व्यक्त केला की, आज या अभ्यासिकांमध्ये केवळ फर्निचर आणि पुस्तके पोहोचली नसून, ती उद्याच्या सक्षम भारताचा पाया आहेत. या केंद्रांतून उद्याचे सनदी अधिकारी, शिक्षक आणि जबाबदार नागरिक घडतील, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. नंदुरबार जिल्ह्याने राबवलेला हा पॅटर्न आता राज्याच्या इतर भागांसाठीही प्रेरणादायी ठरत असून, दुर्गम भागात ज्ञानाचा दिवा अखंड तेवत ठेवण्यासाठी हा उपक्रम मैलाचा दगड ठरणार आहे.

## बोरगाव येथे श्रीमंत यशवंतराव होळकर यांचा राज्याभिषेक सोहळा दिनानिमित्त कार्यक्रम संपन्न

दैनिक वादळ वार्ता

**केज । प्रतिनिधी**



दि.६ जानेवारी रोजी केज तालुक्यातील बोरगाव बु. येथे महाराजाधिराज राज राजेश्वर श्रीमंत महाराजा यशवंतराव होळकर यांच्या राज्याभिषेक सोहळ्याचे औचित्यसाधून आरंभ फाऊंडेशन व अहिल्या प्रबोधनी मंच तर्फे यशवंतराव होळकर यांच्या प्रतिमेचे पुजन करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री. भगवान गाते सर तसेच कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती जगन्नाथ होळकर,लक्ष्मण होळकर, पांडुरंग गाढवे,परमेश्वर खडके,मधुकर भूतकर, आश्रुबा भूतकर,विठ्ठल लोंढे,मधुकर गाते,बन्सी निंगुळे,नवनाथ गाते, बारीकराव होळकर,बन्सी होळकर,अशोक निंगुळे, दगडू निंगुळे,राजेंद्रनिंगुळे, भिवाजी होळकर,श्रीराम निंगुळे,नीलेश निंगुळे, बबन निंगुळे,विष्णू निंगुळे तसेच सकल धनगर समाज बांधव व गावातील प्रतिष्ठित नागरिकांच्या उपस्थितीमध्ये महाराजांचा राज्याभिषेक सोहळा साजरा करण्यात आला.या कार्यक्रमामध्ये महाराजांच्या पराक्रमाचा थोडक्यात इतिहास दीपक होळकर यांनी सांगितला व समाजातील विविध प्रश्नावर चर्चा करण्यात आली.सदरीलकार्यक्रमास आयोजक म्हणून समाधान गाते,निखिल मुसळे,अँड.उत्तरेश्वर निंगुळे,गोपाळ देव निंगुळे, दीपक होळकर(अध्यक्ष अहिल्या प्रबोधिनी मंच), गणेश गुरव,हनुमंत बोराडे यांनी कार्यक्रम आयोजित करून राज्याभिषेक सोहळा अध्यक्ष यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाला.

## तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनात साने गुरुजी निवासी विद्यालयाने पटकावले एकूण चार पारितोषिके

दैनिक वादळ वार्ता

**केज । प्रतिनिधी**



५३ वे केज तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शन गटशिक्षणाधिकारी कार्यालय केज व साने गुरुजी निवासी विद्यालय केज यांच्या संयुक्त विद्यमाने नुकतेच साने गुरुजी निवासी विद्यालय केज या ठिकाणी संपन्न झाले.यात माध्यमिक गटातून पवार अजित बाळासाहेब यांच्या बहुउपयोगी सोलर प्लेट या प्रयोगास तृतीय क्रमांक तसेच उच्च प्राथमिक दिव्यांग गटातून कु.पूजा ठोंबरे हीच्या जल शुद्धीकरण या प्रयोगास प्रथम क्रमांक,माध्यमिक शिक्षक गटातून श्रीमती नागरगोजे मनिषा यांच्या डिजिटल युगात ए आय च्या मदतीने विद्यार्थ्यांना कृतीयुक्त शिक्षणासाठी साहित्य निर्मिती यास प्रथम क्रमांक तर प्रयोगशाळा सहाय्यक गटातून आकाश केदार यांच्या बहू उपयोगी पिठाची चाळणी या प्रयोगास प्रथम क्रमांक मिळालेला आहे.अशा एकूण चार पारितोषिक सह साने गुरुजी निवासी विद्यालय तालुक्यात अव्वल ठरले आहे.या सर्वांना विज्ञान शिक्षिका नागरगोजे मॅडम,श्रुती लहाने मॅडम यांचे मार्गदर्शन लाभले होते.या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष ड.उद्धवराव कराड सर, राजेश कापसे,प्रा.डॉ. कविता गित्ते कराड मडम यांनी या सर्वांचे अभिनंदन करून जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

## नालंदा विद्यालयात सावित्रीबाई फुले जयंती व बालिका दिन साजरा



दैनिक वादळ वार्ता

**केज । प्रतिनिधी**

केज येथील नालंदा विद्यालयात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त बालिका दिन उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक नंदकुमार मस्के तर प्रमुख पाहुणे म्हणून वाघमारे सर आणि गरड सर उपस्थित होते. सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली.

यावेळी विद्यार्थ्यांनी सावित्रीबाई फुले यांच्या जीवनकार्यावर भाषणे, कविता आणि गीतांच्या माध्यमातून आपल्या भावना व्यक्त केल्या. शिक्षक सचिन वाघमारे यांनी सावित्रीबाईंच्या कार्यातील प्रेरणादायी प्रसंग उलगडून दाखवत शिक्षणाचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजावून सांगितले. अध्यक्षीय समारोपात मुख्याध्यापक मस्के सर यांनी सावित्रीबाईंचा जीवनपट आणि स्त्री शिक्षणातील योगदान अधोरेखित केले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शिक्षकवृंदांनी परिश्रम घेतले. शेवटी लोंढे सर यांनी उपस्थितांचे आभार मानले. एकूणच, बालिकांच्या सबलीकरणाचा संकल्प दृढ करणारा हा कार्यक्रम विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागात संपन्न झाला.

## नंदुरबार पोलीस दलाचा 'सुरक्षा जाणीव' जागर; तळोदा कन्या विद्यालयात विद्यार्थिनींना दिले कायदे व सुरक्षिततेचे धडे

दैनिक वादळ वार्ता

**नंदुरबार । दिपक गोसावी**




महाराष्ट्र पोलीस स्थापना दिन सप्ताहाचे औचित्य साधून नंदुरबार जिल्हा पोलीस दलाने सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून विद्यार्थिनींच्या सुरक्षिततेसाठी महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. तळोदा येथील गुलाबबाई दुल्लभ राजकुळे कन्या विद्यालयात पोलीस विभागाच्या वतीने 'सुरक्षा जाणीव' हा विशेष जनजागृती कार्यक्रम उत्साहात पार पडला. या उपक्रमातून पोलीस दलाने विद्यार्थिनींशी थेट संवाद साधत त्यांना सुरक्षिततेचे कवच प्रदान करण्याचा प्रयत्न केला आहे.

पोलीस अधीक्षक श्रवण दत्त एस, अपर पोलीस अधीक्षक आशिष कांबळे व उपविभागीय पोलीस अधिकारी सुभाष भोये यांच्या संकल्पनेतून हा उपक्रम राबवण्यात आला. तळोदा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक राजन मोरे यांनी विद्यार्थिनींना मार्गदर्शन करताना सजगता हीच खरी सुरक्षा असल्याचे अधोरेखित केले. सोशल मीडियाचा वापर करताना ओढवणारी संकटे, महिला व बाल संरक्षण कायदा आणि 'गुड टच-बॅड टच' यातील फरक यावर त्यांनी सविस्तर प्रकाश टाकला. संकटकाळात पोलिसांनी दिलेले कवच किती भक्कम आहे, याची जाणीव यावेळी करून देण्यात आली.

विद्यार्थी हित आणि आपत्कालीन मदत,विद्यार्थिनींच्या हिताला प्राधान्य देत, कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीत न घाबरता पोलीस मदतीसाठी डायल ११२ आणि १९८ या हेल्पलाईन क्रमांकांचा वापर कसा करावा, याचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिक पोलीस दलातर्फे देण्यात आले. तसेच, नायलॉन मांजामुळे होणारे जीवघेणे अपघात टाळून स्वतःचा आणि इतरांचा जीव वाचवण्याचे आवाहन करत पोलिसांनी सामाजिक जबाबदारीची जाणीव करून दिली.

विद्यार्थिनींमधील सुप्त गुणांना वाव देण्यासाठी आणि त्यांच्यात वैचारिक स्पष्टता निर्माण करण्यासाठी 'वाहतूक नियम' व 'महिला सुरक्षा' या विषयांवर वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आली. यात विद्यार्थिनींनी अत्यंत प्रभावीपणे आपले विचार मांडले.त्यात

प्रथम क्रमांक: कु. विद्या कैलास कावेरी,द्वितीय क्रमांक: कु. कोमल सुनील बुवा यांनी पटकवाला विजेत्या विद्यार्थिनींचा पोलीस विभाग व शालेय प्रशासनातर्फे गौरव करण्यात आला.

या कार्यक्रमास विद्यालयाचे मुख्याध्यापक मिलिंद धोदरे, उपमुख्याध्यापक योगेश पाटील, शिक्षकवृंद उल्हास मगरे, अनिल मगरे, हिरालाल पाडवी, सुदाम माळी, धनराज केदार तसेच पोलीस दलातील गोपनीय अंमलदार विजय सोनवणे, अनिल पाडवी आणि ट्रॅफिक पोलीस संदीप महाले उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ज्योती महाजन यांनी केले, तर आभार मुख्याध्यापक मिलिंद ढोडरे यांनी मानले.

## वैराग्य मुर्ती श्रीसंत वामनभाऊ महाराज यांच्या ५०व्या पुण्यतिथी निमित्त दि १० रोजी भाऊ-बाबा प्रतिष्ठान इंद्रप्रस्थ कॉलनी बीड येथे मोरे महाराज यांचे किर्तन

दैनिक वादळ वार्ता

**बीड । प्रतिनिधी**

श्रीसंत भगवानबाबा व श्रीसंत वामनभाऊ प्रतिष्ठान इंद्रप्रस्थ कॉलनी बीड येथे प्रतिवर्षी प्रमाणे याही वर्षी.दि १०जानेवारी शनीवारी रोजी वैराग्य मुर्ती श्रीसंत वामनभाऊ महाराज यांची ५०वी पुण्यतिथी मुर्ती अभिषेक,आरती,किर्तन,प्रसाद यांसारख्या विविध कार्यक्रमाने साजरी करण्यात येत आहे. पुण्यतिथी निमित्त सकाळी १०वाजता जेष्ठ किर्तनकार ह भ प अंगद महाराज मोरे यांचे किर्तनाचे आयोजन करण्यात आले आहे. तरी शहरातील व परिसरातील भाविक भक्तांनी या किर्तनाचा व प्रसादाचा लाभ घ्यावा असे आवाहन श्रीसंत भगवानबाबा व श्रीसंत वामनभाऊ प्रतिष्ठान इंद्रप्रस्थ कॉलनी बीडच्या वतीने अध्यक्ष डॉ राजेंद्र सानप व सर्व सहकारी यांच्या वतीने करण्यात येत आहे.



## आजंदे जि.प.शाळेमध्ये सरस्वतीची सावली श्री शिक्षणाची माऊली

### बोलल्या जाणाऱ्या सावित्रीबाई फुले यांची जयंती उत्साहात साजरी

दैनिक वादळ वार्ता

**जळगाव । जितु इंगळे**




रावेर तालुक्यातील अजंदा येथे जिल्हा परिषद शाळेमध्ये माता सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी करण्यात आली . सावित्रीबाई फुले यांची जयंती आज देशभरात साजरी केली जात आहे. अनेक मुली आणि महिलांसाठी प्रेरणास्थान असलेल्या सावित्रीबाई फुले या देशातील पहिल्या महिला शिक्षिका होत्या. मुलींच्या शिक्षणात त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली.

३ जानेवारी १८३१ रोजी महाराष्ट्रातील नायगाव येथे जन्मलेल्या सावित्रीबाई फुले यांनी जात आणि लिंग-आधारित भेदभावाविरुद्ध दीर्घ लढा दिला. त्यांचे पती, समाजसुधारक ज्योतिराव फुले यांच्यासोबत त्यांनी पुण्यात पहिली मुलींची शाळाही उघडली. महिला शिक्षण आणि सक्षमीकरणात महत्त्वपूर्ण योगदान देणाऱ्या सावित्रीबाई फुले यांची आज १९५ वी जयंती आहे. यांची जयंती आज जिल्हा परिषद शाळेमध्ये उत्साहात साजरी करण्यात आली. त्यात उपस्थित. तिथे उपस्थित शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष जितु भाऊ इंगळे. उपाध्यक्ष अनिल भाऊ कोळी . शाळेचे मुख्याध्यापक.श्रीमती मनिषा प्रल्हाद पाटील.उप मुख्याध्यापक श्री किरण चिंधूजी सावळे सर . श्री विठ्ठल बबन धुमाळ शिक्षणसेवक.कुमारी गायत्री गोविंदा पाटील. तसेच अंगणवाडी स्टॉप सोनल अरविंद बिरपन सौ.नलिनीबाई सोपान पाटील सौ मायाबाई रुपचंद सोनवणे श्रीमती प्रतिभा यशवंत पाटील श्रीमती सोनल मोहन सुर्यवंशी श्रीमती लतिका सेनू लोखंडे सौ. अलका अशोक सोनवणे. शाळेतील पूर्ण विद्यार्थी विद्यार्थिनी उपस्थित होते.

## लोकनेते गोपीनाथ मुंडे यांचा पुतळा अनावरण सोहळा उत्साहात

### लोकनेते गोपीनाथ मुंडे हे नाव जगाला विसरू देणार नाही - पर्यावरणमंत्री पंकजाताई मुंडे



दैनिक वादळ वार्ता

**लोहा । प्रतिनिधी**

माळाकोळी येथे लोकनेते स्व. गोपीनाथराव मुंडे यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचा अनावरण सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे व माजी मंत्री धनंजय मुंडे यांच्या हस्ते रविवारी हा समारंभ संपन्न झाला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी जि.प. सदस्य चंद्रसेन पाटील सुरनर होते. आमदार तुषार राठोड, अध्यक्ष ऊसतोड महामंडळ गोविंद केंद्रे, माजी खासदार सुधाकर शृंगारे, माजी आमदार रोहिदास चव्हाण, शंकर अण्णा धोंडगे, विविध लोकप्रतिनिधी, सामाजिक कार्यकर्ते व मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या वेळी पंकजाताई मुंडे म्हणाल्या, गोपीनाथराव मुंडे यांचे नाव कधीच विसरले जाणार नाही. मी सत्तेत असो वा नसो, या नावाची परंपरा आणि कार्य जनतेपर्यंत पोहोचवत राहणार आहे. माजी मंत्री धनंजय मुंडे यांनीही भाषण करताना साहेबांच्या संघर्षमय कार्यातून प्रेरणा घेऊन आपण समाजकार्यात पुढे जात आहोत, असे सांगितले. समारंभानिमित्त स्मारक उभारणीत सहकार्य करणाऱ्या मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. पुतळ्याच्या शिल्पकारांचा विशेष गौरव करण्यात आला. परिसरात मोठ्या प्रमाणावर नागरिकांची उपस्थिती होती. उत्साही व भावनिक वातावरणात कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडला.

# कोकणच्या किनाऱ्यावर घुमला सातपुड्याचा 'डफ' बोरदच्या मॉडर्न स्कूलची शैक्षणिक सहल उत्साहात!

## पुस्तकी ज्ञानाला अनुभवाची जोड; सहलीचा शेवटचा टप्पा अद्याप बाकी

दैनिक वादळ वार्ता

**नंदुरबार । दिपक गोसावी**

विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकी ज्ञान न देता त्यांना महाराष्ट्राचा गौरवशाली इतिहास आणि निसर्गाची प्रत्यक्ष प्रचिती यावी, या उद्देशाने बोरद येथील मॉडर्न इंग्लिश स्कूल व ज्युनिअर कॉलेजच्या इयत्ता ९ वी ते १२ वीच्या विद्यार्थ्यांची शैक्षणिक सहल सध्या कोकण परिसरात उत्साहात सुरू आहे. अथांग समुद्र आणि ऐतिहासिक गड-किल्ल्यांचा वारसा अनुभवत असलेल्या या सहलीचा एक दिवस अद्याप शिल्लक असून, विद्यार्थ्यांमध्ये प्रचंड उत्साह पाहायला मिळत आहे. या सहलीचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे विद्यार्थ्यांनी आपल्या सातपुड्याची ओळख असलेले 'डफ' वाद्य सोबत नेले आहे. कोकणातील प्रेक्षणीय स्थळांना भेटी देताना विद्यार्थी ज्या ज्या ठिकाणी जात आहेत, तिथे आपल्या संस्कृतीचे दर्शन घडवत डफ वाजवत आहेत. डफांच्या या तालावर केवळ विद्यार्थीच नव्हे, तर शिक्षकही ठेका धरताना दिसत आहेत. सातपुड्याचा हा नाद ऐकून कोकणातील स्थानिक दुकानदार आणि पर्यटक भारावून गेले असून विद्यार्थ्यांचे कौतुक करत आहेत. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना समुद्र पाहण्याची मोठी ओढ असते, ती या सहलीमुळे पूर्ण झाली आहे. शिवकालीन गड-किल्ल्यांच्या भेटीतून विद्यार्थ्यांना इतिहासाचे धडे प्रत्यक्ष स्थळावर मिळत आहेत. आम्ही जे किल्ले पुस्तकात वाचले होते, ते आज डोळ्यांनी पाहत आहोत, अशा भावना विद्यार्थ्यांनी व्यक्त केल्या आहेत. यातून विद्यार्थ्यांच्या भौगोलिक आणि ऐतिहासिक ज्ञानात मोलाची भर पडत आहे. संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मण माळी यांच्या मार्गदर्शनाखाली प्राचार्य निलेश सूर्यवंशी व पर्यवेक्षक विनोद सूर्यवंशी यांनी शासनाच्या सर्व नियमांचे पालन करत सहलीचे चोख नियोजन केले आहे. शिक्षक एस.बी.पाटील, एस.एन. सोनार, एम.यू. पिंपरे आणि प्रा.एस.बी.पाडवी हे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक मार्गदर्शन करत असून, शिक्षिका प्रीती लोहार यांच्याकडे विद्यार्थिनींच्या शिस्तीची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. कोकणातील महत्त्वाचे टप्पे पूर्ण केल्यानंतर आता ही सहल अंतिम टप्प्यात पोहोचली आहे. सहलीचा एक दिवस अद्याप शिल्लक असून उर्वरित प्रेक्षणीय स्थळांना भेट देण्यासाठी विद्यार्थी सज्ज आहेत. पालकांनी शालेय प्रशासनाच्या नियोजनावर समाधान व्यक्त केले आहे. आता सर्वांना वेध लागले आहेत ते या यशस्वी सफरीनंतर विद्यार्थ्यांच्या बोरदमध्ये होणाऱ्या स्वागताचे!



## जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा कुंबेफळ येथे बालिका दिन साजरा



दैनिक वादळ वार्ता

**केज । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा कुंबेफळ येथे क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त बालिका दिन उत्साहात साजरा करण्यात आला. इयत्ता ६वी व ७वीतील विद्यार्थिनींनी सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात मुख्याध्यापक राजाभाऊ कदम यांनी सावित्रीबाईंच्या कार्याचा आढावा घेत सांगितले की, त्यांनी मुलींच्या शिक्षणाचा दीप प्रज्वलित करून समाज सुधारणा चळवळीला नवे दिशा दिली. मुलींची पहिली शाळा सुरू करून महिलामुक्तीचा पाया घातल्याने आजचा दिवस बालिका दिन व महिलामुक्ती दिन म्हणून साजरा केला जातो, असे त्यांनी सांगितले. कार्यक्रमात शिक्षक डॉ. रामकिशन मुळे, आकाश लोंढे, राहुल बचुटे, संदीप ठोंबरे, आबासाहेब धपाटे, तसेच शिक्षिका निलावती भोरे, अंजली उटीकर, रोहिणी काळे-थोरात यांनी मार्गदर्शन केले. सुमारे ८० विद्यार्थ्यांनी कार्यक्रमात सहभाग घेतला. विद्यार्थिनींनी सावित्रीबाई फुले यांच्या जीवनावर आधारित गीत सादर केली तसेच मनोगते व्यक्त केली.बालिका दिनानिमित्त रांगोळी व वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आल्या व विजेत्यांना प्रोत्साहनपर बक्षिसे देण्यात आली. कार्यक्रमास सरपंच अविनाश पांचाळ, शाळा व्यवस्थापन समिती पदाधिकारी, पालक, ग्रामपंचायत सदस्य व ग्रामस्थांची उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन इयत्ता ७ वीतील आर्या थोरात हिने केले, तर आभार प्रदर्शन पद्मजा थोरात हिने मानले.

## तेलखेडी गावला बाधित क्षेत्रातून वगळल्याचा आरोप; चौकशी व तात्काळ नुकसानभरपाईची मागणी

दैनिक वादळ वार्ता

**मोगली । रवींद्र वळवी**

नोव्हेंबर २०२५ मधील अवकाळी पावसामुळे तेलखेडी येथील शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात झालेले पीक नुकसान असूनही गावाचा बाधित क्षेत्र यादीत समावेश न केल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणाची चौकशी करून शेतकऱ्यांना तातडीने नुकसानभरपाई मंजूर करावी, या मागणीचे निवेदन युवा क्रांती संघटना व बाधित शेतकऱ्यांच्या वतीने अक्राणी तहसीलदारांना देण्यात आले.

निवेदनात म्हटले आहे की, गावामध्ये सरसकट पंचनामे होऊन त्रिस्तरीय समितीच्या अधिकाऱ्यांच्या सह्या असलेले पंचनामे सादर केल्यानंतरही तेलखेडी गावाचा समावेश न करणे हे अन्यायकारक व संशयास्पद आहे. काही अधिकाऱ्यांची भूमिका संशयास्पद असून जाणीवपूर्वक गाव वगळल्याचा आरोपही करण्यात आला आहे.

नुकसानभरपाई ही शेतकऱ्यांचा हक्क असून,



प्रशासनाने पारदर्शक चौकशी करून तेलखेडी गावाला बाधित क्षेत्र म्हणून घोषित करावे व तात्काळ मदत वितरित करावी, अशी मागणी करण्यात आली. अन्यथा दोन दिवसांत कार्यवाही न झाल्यास शहादा-धडगाव मार्गावर रस्ता रोको आंदोलन करण्याचा इशाराही निवेदनात देण्यात आला आहे.

या निवेदनावर युवा क्रांतीचे तालुका प्रमुख लक्ष्मण पाडवी, संपर्क प्रमुख बावा पावरा तसेच अनेक बाधित शेतकऱ्यांच्या सही आहेत.

## लोकशाही पत्रकार संघ व सोमेश्वर हनुमान मंदिर फाउंडेशन तर्फे 'लोकरत्न पुरस्कार' वितरण



दैनिक वादळ वार्ता

**बीड । प्रतिनिधी**

बार्शी रोडवरील श्री सोमेश्वर मंदिर येथे दर्पण दिनानिमित्त लोकशाही पत्रकार संघ व सोमेश्वर महादेव हनुमान मंदिर फाउंडेशन यांच्या वतीने महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांतील संपादक, पत्रकार व समाजसेवकांना 'लोकरत्न पुरस्कार' देऊन सन्मानित करण्यात आले.कार्यक्रमाला जिल्हाधिकारी विवेक जॉनसन, पोलिस अधीक्षक नवनीत कावत, तसेच विविध विभागांतील अधिकारी, संपादक व सामाजिक कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. फाउंडेशनचे अध्यक्ष व संघाचे उपाध्यक्ष नवनाथ शिरोळे-पाटील यांनी सर्व मान्यवरांचा सन्मान करून त्यांच्या कार्याचा गौरव केला.उत्कृष्ट सूत्रसंचालन आत्माराम वावळकर यांनी केले. पुरस्कारामुळे पत्रकार व समाजसेवकांच्या कार्याला मोठी प्रेरणा मिळाल्याचे मान्यवरांनी नमूद केले.

## नंदकुमार गादेवार यांचा एकसष्टी सोहळ्या निमित्त विविध कार्यक्रम उत्साहात संपन्न

दैनिक वादळ वार्ता

**नायगाव । हनुमंत चंदनकर**

महाराष्ट्र आर्य वैश्य महासभेचे नंदकुमार गादेवार यांचा अभिष्टचिंतन सोहळा विविध कार्यक्रमाने थाटात सोहळा संपन्न झाला. महाराष्ट्र राज्याचे महासभेचे अध्यक्ष तथा समाजभूषण नंदकुमारजी गादेवार यांच्या ६१वा अभिष्टचिंतन सोहळा नांदेड येथील वासवी मंगल कार्यालय सिडको येथे आयोजित करण्यात आला होता यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष नांदेड दक्षिणचे आमदार आनंदराव बोंढारकर . सत्कारमूर्ती नंदकुमार गादेवार व त्यांच्या पत्नी सौ राजश्री गादेवार.तर विशेष प्रमुख अतिथी गुरुवर्य एकनाथ महाराज साधू व गुरुवर्य ज्ञानेश्वर महाराज साधू. काशी अन्नपूर्णा सत्रमचे विलासजी बच्चू . आर्य



वैश्य महासभेचे महासचिव गोविंदरावजी बिडवई. प्रसिद्ध उद्योगपती दीपक निलावार नागपूर एकनाथराव मामडे. अनिलजी मनाठकर. बालाजीराव बच्चेवार. डॉ शिरपेवार. नंदकुमार मडगूलवार. सदानंद मेडेवार. प्रणव मनुरवार. बिपिन गादेवार. डॉ सौ ढमढेरे.प्रदीपजी कोकडवार. सुलभा वट्टमवार गजानन चीद्रेवार. दत्तात्रय चौधरी. गजानन चौधरी. किरण मुक्कावार.जिल्हाध्यक्ष प्रभाकर पत्तेवार चंद्रकांत सा कवटीकवार. सतीश मेडेवार. सूर्यकांत कवटीकवार. पवन गादेवार. साईनाथ मेडेवार. बालाजी चिंतावर. बालाजी कोटलवार. पोलावार.आदी सहप्रमुख मान्यवर . पदाधिकारी. समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला कन्याका परमेश्वरी माता. गुरुवर्य रंगनाथ महाराज यांच्या प्रतिमेची पूजा करण्यात आली . सत्कार मूर्ती सहप्रमुख मान्यवरांचा सन्मान करण्यात आला .काशी अन्नपूर्णा सत्रमच्यावतीने देण्यात येणाऱ्या समाजातील होतकरू गोरगरीब विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी आर्थिक मदत देऊन तसेच नुकत्याच झालेल्या नगरपालिका निवडणुकीत समाजातील निवडून आलेल्या नगराध्यक्ष . नगरसेवक.सन्मान करण्यात आला.

## जिल्हा परिषद प्राथमिक शाळा केवड येथे जेष्ठ पत्रकार दिलीपराव सपाटे यांची सदिच्छा भेट ; शिक्षकांनी केले स्वागत

दैनिक वादळ वार्ता

**केज । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा केवड येथे श्री.दिलीपराव सपाटे (मुंबई मंत्रालय, पत्रकार) यांनी नुकतीच भेट देऊन शाळेच्या अडचणी जाणून घेतल्या. यावेळी त्यांनी शाळेसाठी किचन रूम तसेच संरक्षण भित उभारून देण्याचे आश्वासन दिले.यासोबतच शाळेसाठी रोख रक्कम २५०० रुपये देऊन शाळेच्या कामकाजाबाबत समाधान व्यक्त केले.या शालेय भेटी प्रसंगी ग्रामसेवक श्री.जुगदर, सरपंच श्री.बाळासाहेब सत्वधर, ग्रामपंचायत सदस्य श्री.रमेश पवार, मुख्याध्यापक पठाण मुखतार सर,सहशिक्षिका श्रीमती हंगे सुवर्णमाला, ग्रामस्थ व पालक वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमा दरम्यान उपस्थित मान्यवरांचा शाळेच्या वतीने सत्कार करण्यात



आला.शाळेच्या सर्वांगीण विकासासाठी व गुणवत्ता वाढीसाठी पालकांनी सक्रियसहभाग घ्यावा,असे आवाहन यावेळी करण्यात आले.या भेटीमुळे शाळेच्या विकासाला निश्चितच चालना मिळेल,असा विश्वास ग्रामस्थ व पालकांनी व्यक्त केला.

## माजलगाव पत्रकारिता नि:पक्षपाती-पणाची-आ.प्रकाश सोळंके

दैनिक वादळ वार्ता

**माजलगाव । दर्शन डोंगरे**

माजलगाव पत्रकार संघाच्या वतीने दर्पण दिनानिमित्त विविध क्षेत्रातील मान्यवरांना पुरस्कार वितरण समारंभ वैष्णवी मंगल कार्यालयात मोठ्या उत्साहात पार पडला. या प्रसंगी आमदार प्रकाश सोळंके यांनी माजलगावची पत्रकारिता नि:पक्षपाती आहे व बाळशास्त्री जांभेकर यांच्या विचारांचा वारसा इथले पत्रकार जपत आहेत, असे गौरवोद्गार काढले. तर माजी आमदार बाजीराव जगताप यांनी आई-वडिलांची सेवा करणाऱ्यांना काशीला जाण्याची गरज नसते; त्यांचीच सेवा हे खरे तीर्थ आहे, असे सांगत मूल्यसंस्कारांचे महत्त्व अधोरेखित केले.

कार्यक्रमात दर्पणसह विविध पुरस्कारांचे वितरण करण्यात आले. दर्पण पुरस्कार जेष्ठ पत्रकार सुधाकर देशमुख, माजलगाव भूषण



मा. आ. बाजीराव जगताप, समाजभूषण मंगलाताई सोळंके, तर यशस्वी उद्योजक पुरस्कार शेख अब्दुल सत्तार यांना प्रदान करण्यात आले. नुतन नगराध्यक्षा शिफा चाउस यांचा विशेष सत्कारही करण्यात आला.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी जेष्ठ पत्रकार उमेश मोगरेकर होते. प्रारंभी बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेस पुष्पांजली अर्पण करून दीपप्रज्वलन करण्यात आले. स्वागतगीताने कार्यक्रमाचा शुभारंभ झाला. कार्यक्रमास महिलांसह तरुण-तरुणी, पत्रकार, विविध क्षेत्रातील मान्यवर आणि नागरिकांची लक्षणीय उपस्थिती होती. सूत्रसंचालन अशोक वाडेकर यांनी केले तर आभार पत्रकार कुणाल दुगड यांनी मानले.

एकूणच, समाजभूषण आणि पत्रकार भूषणांचा कळस गाठणारा हा कार्यक्रम माजलगावच्या पत्रकारितेची निर्भिड व नि:पक्षपाती परंपरा अधोरेखित करणारा ठरला.

## लोकशाहीत पत्रकारांचे मोठे योगदान-आ.धनंजय मुंडे

दैनिक वादळ वार्ता

**परळी । प्रतिनिधी**

परळी येथे शहर व तालुका पत्रकार संघाच्या वतीने आयोजित दर्पण दिन सोहळ्यात लोकशाही बळकट करण्यासाठी पत्रकारांचे योगदान महत्त्वपूर्ण असल्याचे प्रतिपादन आमदार धनंजय मुंडे यांनी केले. टीआरपीच्या शर्यतीत भडक मथळ्यांच्या आहारी न जाता जबाबदार पत्रकारिता होणे काळाची गरज आहे, असे ते म्हणाले.

डॉ. वि. ल. धारूरकर यांनी बदलत्या तंत्रज्ञानासोबत पत्रकारांनी स्वतःमध्ये बदल करण्याची गरज व्यक्त केली, तर प्रा. टी. पी. मुंडे यांनी कोणत्याही दबावाला न झुकता सत्य लेखन करण्याचे आवाहन केले. परळी शहराच्या विकासासाठी पत्रकारांनी बांधिलकीने साथ द्यावी, असे प्रतिपादन नगराध्यक्षा पद्मश्री बाजीराव धर्माधिकारी यांनी केले.

कार्यक्रम छत्रपती शिवाजी महाराज चौक



येथील शासकीय अतिथीगृहात पार पडला. अध्यक्षस्थानी ज्येष्ठ पत्रकार शंकराप्पा मोगरकर होते. कार्यक्रमास प्रशासकीय अधिकारी, लोकप्रतिनिधी आणि विविध क्षेत्रांतील मान्यवरांची उपस्थिती होती.दर्पण दिनानिमित्त पत्रकार बांधवांना विविध स्मृती पुरस्कारांनी गौरविण्यात आले. यामध्ये मोहनलाल बियाणी स्मृती पुरस्कार - धनंजय आढाव, प्रकाश नवाडे स्मृती पुरस्कार - ओमप्रकाश बुरांडे, एम.पी. कनके स्मृती पुरस्कार - आत्मलिंग शेटे, 'जगमित्र' पुरस्कार - लक्ष्मण वाकडे, कैलास शर्मा स्मृती पुरस्कार - प्रा. प्रवीण फुटके, तसेच प्रशांत जोशी स्मृती पुरस्कार - धनंजय आरबुने यांचा समावेश होता. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अनंत मुंडे यांनी केले तर आभार प्रदर्शन भगवान साक्षामुद्रे यांनी केले. एकूणच, सत्यनिष्ठ आणि जबाबदार पत्रकारितेचा संकल्प दृढ करणारा हा दर्पण दिन सोहळा उत्साहात संपन्न झाला.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077